# वधू-वरांचे गुणमेलन

## शास्त्रशुद्ध पद्धती

लेखक

विज्ञाननिष्ठ ज्योतिषी, ज्योतिषपंडित **सुधीर दाते**

तरडे हाईट्स, तरडे कॉलनी, सिंहगड रस्ता, हिंगणे खुर्द, पुणे ४११ ०५१

फोन : ०२०-२४३५६५५४ , मोबाईल : ९४२३००९६५२ , **e-mail :sumangalsuvidha@gmail.com**

---

आपल्या कुटुंबातील विवाहयोग्य वधूसाठी किंवा वरासाठी स्थळे शोधताना पत्रिका बघण्याच्या प्रक्रियेत आनेक समस्यांना सामोरे जावे लागते. आनेक चुकीच्या रुढया, गैरसमज आणि अज्ञान ह्यामुळे अनेक स्थळे जुळत असूनही हातातून निसटत असतात. हे लक्षात न आल्यामुळे “आमची पत्रिकाच कुठे जुळत नाही” असे नैराश्ययुक्त उद्गार ऐकिवात येत असतात.

थोडक्यात समाज तथाकथित सुशिक्षित झाला तरीही ज्योतिषशास्त्राचा प्रसार अयोग्य पद्धतीने आणि मर्यादित स्वरुपात झाल्यामुळेच समाजाचे नुकसान होताना अनुभवास येते. ह्यासाठी ज्योतिषांनीच समुपदेशन व प्रचार शास्त्रशुद्ध पद्धतीने करण्याची खरी गरज आहे. परंतु तसेही घडताना दिसत नाही. कारण अनेक ज्योतिषांना पत्रिका जुळतात किंवा नाही हे पहावे कसे ह्याचे आकलन नसते असा माझा अनुभवसिद्ध निष्कर्ष आहे.म्हणून योग्य, शास्त्रशुद्ध पद्धतीने पत्रिकामेलन कसे पहावे ह्याबद्दल माहिती करुन देणे आवश्यक आहे.

### चुकीच्या रुढया, गैरसमज, अज्ञान

मंगळदोष आहे की नाही हे नीट माहिती नसणे, मंगळाच्या पत्रिकेस मंगळाचाच जोडिदार लागतो असा गैरसमज असणे, ३६ गुण जुळू नयेत ह्या आणि अशा अपप्रचाराचे बळी नेहमीच निदर्शनास येतात. ह्यामुळेच अनेक जुळणारी स्थळे त्यांच्या हातातून जातात.

### पत्रिकेचा आराखडा

दुसऱ्यास देण्यासाठी तयार केलेल्या पत्रिकेतसुद्धा अनेकप्रकारचे दोष आढळतात. मध्यरात्री जन्म असणाऱ्यांच्या पत्रिका हमखास चुकीच्या सापडतात.ह्यासाठी पत्रिका बिनचूक आणि पूर्ण असावी. म्हणजे जन्मतारीख(इंग्रजी मापनानुसार रात्री १२ वा. बदलणारी), जन्मवेळ(भारतीय प्रमाण वेळेनुसार म्हणजे २४ ताशी कालमापनानुसार ), राशि, नक्षत्र, चरण ह्यांचा मुख्यतः उल्लेख असायलाच हवा. ह्या शिवाय गोत्र, नक्षत्रशांति केलेली असल्यास त्याचा उल्लेख असावा. ह्या कुंडलीला मंगळदोष आहे की नाही हे ज्योतिषाकडून नीट समजावून घेऊन त्यानुसार उल्लेख असावा. गैरसमजुतीमुळे जाणारी स्थळे वाचण्यासाठी ह्यांचा उपयोग होतो.

### मंगळदोषासंबंधीची उपयुक्त माहिती




शेजारील कुंडलीच्या आराखडयात प्रथम, चतुर्थ, सप्तम आणि अष्टम ह्यापैकी कोणत्याही स्थानात मंगळ असल्यास मंगळदोषाची पत्रिका आहे असा गैरसमज झाल्याचे अनेक वेळा अनुभवास येते. परंतु खरंच हा मंगळ सदोष आहे का हे ठरविण्यासाठी पुढील माहिती समजावून घ्यावी.

कोणकोणत्या कारणाने मंगळदोष नाहिसा होतो हे आता पाहू या.

(१) जन्मलग्न कुंडलीत मंगळ कोणत्या राशित आहे एवढेच पहावे. मिथुन व कन्या ह्या मंगळाच्या शत्रूराशि तर कर्क ही मंगळाची नीचीची राशि असल्याने मंगळ कोणत्याही स्थानात ३,४ किंवा ६ (१) जन्मलग्न कुंडलीत मंगळ अंकासह असल्यास तो निर्बली होतो. ह्या नंतरच्या सर्व कारणांची तपासणी करण्यासाठी भावचलीत कुंडली पहाणे आवश्यकअसते.

(२) मंगळ रविच्या पुढे किंवा मागे १५ अंशात असल्यास, राशि निराळया असल्या तरी तो अस्तंगत असतो. असा मंगळ निर्बली असतो.

(३) गुरू ह्या ग्रहाच्या शुभ दृष्टीत म्हणजेच गुरूपासून ५व्या, ७व्या किंवा ९व्या स्थानात मंगळ असल्यास तो निर्बली असतो.

(४) द्वादश स्थानात धनु राशित(९ आकडयात), प्रथम स्थानात मेष राशित(१ आकदयात), चतुर्थ स्थानात वृश्चिकेत(८ आकदयात), सप्तम स्थानात मकरेत(१० आकडयात) किंवा अष्टमस्थानात सिंहेत (५ आकडयात) असणारा मंगळ निर्बली असतो.

वरीलपैकी २ ते ५ पर्यंतची कारणे तपासणे सामान्य व्यक्तीस जमणार नाही. म्हणून ज्योतिषाची मदत अवश्य घ्यावी.

ह्या सर्व अटींचा विचार करून शेवटी जरी मंगळदोष आहे हे सिद्ध झाले तरी जोडीदार मंगळदोषाचा असलाच पाहिजे असा नियम नाही. जोडदिराच्या पत्रिकेत मंगळदोष नसला तरी ठराविक परिस्थितीत ती पत्रिका मंगळदोषाच्या पत्रिकेशी जुळते. ती ग्रहस्थिती अशी. जोडीदाराच्या पत्रिकेत (१) दाखविलेल्या सात स्थानात कोठेही शनी असेल, (२) प्रथम किंवा सप्तम स्थानात स्वराशित किंवा उच्चीचा म्हणजे २, ७ किंवा १२ आकडयासह असेल तर अशी पत्रिका मंगळाच्या पत्रिाकेशी जुळते. अर्थात ही ग्रहस्थिती तपासताना **भावचलीत कुंडलीचाच** विचार करायला हवा. त्यासाठी ज्योतिषाचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

## गोत्र

ज्यासमाजात गोत्र पहाण्याची प्रथा आहे त्यांनी ते अवश्य पहावे. त्याला शास्त्राधार आहे. सगोत्र आणि न जुळणाऱ्या गोत्रांशी सोयरिक जोडू नये. वधू-वराच्या दत्तक जाण्याने गोत्रात बदल होत नाही.

## पंचागातील कोष्टकांचा वापर कसा करावा?

गोत्र आणि मंगळदोष ह्यांचा विचार झाल्यानंतर आता पंचांगातील तीन कोष्टकांपैकी सर्वप्रथम **नाडीपादवेध कोष्टकाचा** उपयोग करावा. ह्या कोष्टकातील कोणत्याही एका आडव्या पट्टीत दर्शविलेल्याच फक्त नक्षत्रचरणांचा एकमेकांशी नाडीदौष ग्राह्य मानावा.

त्यातही जी नक्षत्र-चरणे एकाच राशिची असतील त्यांना एकनाडी दोष लागू होत नाही. हे विशेष लक्षात घ्यावे. थोडक्यात नुसती दोघांची नक्षत्रे एका नाडीची आहेत म्हणून एकनाडी दोषामुळे पत्रिका जुळत नाहीत असा निर्णय घेणे चुकीचे आहे. एक नाडी दोष नाही हे एकदा निश्चित झाले की, दुसऱ्या **अभिनव विवाह मेलन कोष्टकाचा** उपयोग करावा. ह्या कोष्टकात आडव्या व उभ्या रकान्यात प्रत्येकी सहासहा राशि दाखविलेल्या आहेत. वर आणि वधू ह्यांची नक्षत्र-चरणे कोणत्याही एकाच बाजूच्या रकान्यांमधे येत असल्यास **पत्रिका जुळतात असा निर्णय होतो.** जर दोघांची नक्षत्र-चरणे आडव्या व उभ्या रकान्यात येत असल्यास त्यांच्यापासूनच्या उभ्या आणि आडव्या पट्टयांच्या छेदाच्या ठिकाणी रिकामी चौकट असल्यास **पत्रिका जुळतात असा निर्णय होतो.** वरील दोन्हीपैकी कोणत्याही पद्धतीने पत्रिका जुळत असल्यास नंतर तिसऱ्या **घटित गुणमेलन कोष्टकानुसार गुण पहाण्याची आवश्यकता नसते. गुण १८ पेक्षा कमी असले तरीही पत्रिका जुळतात** हे इथे विशेष लक्षात घ्यावे. परंतु पट्टयांच्या ठिकाणी फुली आल्यास मात्र तिसऱ्या घटित गुणमेलन कोष्टकानुसार

गुण पहाण्याची आवश्यकता असते. अशा वेळी जर गुण १८ पेक्षा कमी असले तरच फक्त पत्रिका जुळत नाहीत असा निर्णय घ्यावा.

## मृत्युषडाष्टक असताना पत्रिका जुळतात का?

वधू-वरांच्या नक्षत्र-चरणाच्या नवमांशाचे स्वामी जर एकमेकांचे मित्र असतील तर मृत्युषडाष्टक असूनही पत्रिका जुळतात. अर्थात तीन कोष्टकांचा उपयोग वर वर्णन केल्यानुसार करावाच.परंतु सामान्य व्यक्तीस पंचागातील कोष्टके पहाणे आणि वरील सर्व गोष्टींचा विचार करणे जिकिरीचे वाटते. ह्या समस्येतून मार्ग काढण्याच्या माझ्या प्रयोगांना यश आले ते वैयक्तिक गुणमेलन कोष्टकांच्या निर्मितीतून.

## वैयक्तिक गुणमेलन कोष्टके

प्रत्येक नक्षत्र-चरणासाठी एक ह्याप्रमाणे वधूंसाठी १०८ आणि वरांसाठी १०८ अशी एकूण २१६ कोष्टके तयार करण्यात मला यश आले ते इ. स. १९९९ साली. वस्तुस्थितीत हजाराहून अधिक स्थळांनी आत्तापर्यंत त्याचा उपयोग करून समाधान व्यक्त केले आहे.

ज्याच्यासाठी कोष्टक बनवायचे असेल त्याची जन्मतारीख, जन्मवेळ, जन्मठिकाण व गोत्र ही माहिती दिल्यास उपयुक्त माहितीसह कोष्टक बनवून दिले जाते. हे स्वतःसाठीचे गुणमेलन कोष्टक एकदा आपल्या जवळ असले की, त्याचे अनेक फायदे अनुभवास येतात.विवाह मंडळातून स्थळे निवडताना पत्रिका जुळणारीच स्थळे निवडता येतात. गैरसमजामुळे पत्रिका जुळत नाही असे आता घडणारच नाही. त्यामुळे चांगली स्थळे हातातून निसटणार नाहीत. बघण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर 'पत्रिका जुळत नाही' ह्या चुकीच्या कारणाने दिल्या जाणाऱ्या नकारांना आळा बसेल.असे हे अनुभवसिद्ध बहूपयोगी गुणमेलन कोष्टक आहे.

## ज्योतिषाचा, महत्त्वपूर्ण उपयोग कधी करावा ?

वरील पद्धतीने एकदा पत्रिका जुळतात असा निर्णय झाला की, वधू-वरांच्या मुलाखतीचा कार्यक्रम करावा. एकंदरीत स्थळ योग्य वाटत असेल व होकार देण्याची व येण्याचीही शक्यता निर्माण झाल्यावर आता ज्योतिषसल्ला घेण्याची वेळ आली आहे हे समजावे. हा **ज्योतिषी सज्ञान असावा** व वरील परिस्थितीत ज्योतिषाची भूमिका काय असावी व ह्या नंतर नक्की काय बघायचे ह्याचे त्यास आकलन असावे. थोडक्यात उपमा देऊन सांगायचे तर तो ज्योतिषी नुसता एम. बी. बी.एस. नसावा तर एम.डी.असावा. पीएच. डी. असल्यास उत्तमच. ही महत्त्वाची सूचना. कारण निर्णय आयुष्याचा असतो.

ह्या ज्योतिषाचे कर्तव्य म्हणजे दोघांच्याही पत्रिका एकमेकांवर ठेऊन त्यांचे लग्नेश, पंचमेश, सप्तमेश व भाग्यैश ह्यांचे परस्पर संबंध अशुभ नाहीत ना हे पहाणे होय.

ह्या चार भावेशांचे संबंध का पहायचे ते आता समजावून घेऊ. लग्नेशावरून उभयतांची व्यक्तिमत्त्वे पूरक आहेत ना हेपाहिले जाते. कारण त्यावरच तर खरा संसार अवलंबून असतो. पंचमेश संबंधावर संतती असणे आणि असलेली सुदृढ, चांगली असणे, तर सप्तमेश संबंधावरून उभयतांमधील सहकार्य भावना, एकमेकांना धरून राहण्याची वृत्ती ह्याचा विचार करायचा असतो. भाग्येश संबंधावर एकमेकांचा भाग्योदय अवलंबून असतो. परस्प्रांच्या पत्रिकांचा एकमेकांवर परिणाम होतो ही शास्त्रीय बैठक आहे. म्हणून तर हे सर्व बघायचे.

हे चार भावेश संबंध समाधानकारक असल्यानंतर नवीन, आगामी व्यक्तिमत्त्व, जे आपल्या कुटुंबाचा घटक बनणार, त्याची वैयक्तिक पत्रिका चांगल्या दर्जाची असणे हेही गरजेचे आहे. म्हणून जोडीदाराच्या वैयक्तिक पत्रिकेच्या दर्जाचा विचार करणे आवश्यकआहे.

वरील मुद्यांसंबंधी ज्योतिषाचे मत त्याने संपूर्ण अहवाल स्वरुपात लेखी द्यावे. त्यात निरीक्षणे, अभ्यास व निष्कर्ष ह्यांचा समावेश असावा. त्यातील निष्कर्षानुसार होकार-नकाराचा निर्णय घ्यावा. महत्त्वाची सूचना म्हणजे

होकार दिल्यानंतर पत्रिका ज्योतिषास दाखवत बसण्याची चूक कधीही करू नये.

ज्योतिषशास्त्रीय अहवालानुसार होणारा निर्णय हा संपूर्णपणे गोपनीय आणि एकपक्षीय ठेवावा. कारण नकार द्यायचा असेल तर सुरुवातीस पत्रिका जुळते असे सांगितल्यानंतरच मुलाखतीचा कार्यक्रम झालेला असल्याने आता 'पत्रिका जुळत नाहीत' असे सांगणे हे संपूर्णपणे चुकीचे आहे. अशावेळेस फक्त "आपले योग नाहीत" एवढेच कळवावे. त्यावर चर्चा करू नये. "पत्रिका खराब आहे" असे सांगून दुसऱ्याच्या घरातील वातावरण गढूळ करण्याचा आपल्यालाअधिकार नसतो ह्याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

थोडक्यात स्थळ संशोधनाच्या मोहिमेतील महात्त्वाचा अडथळा म्हणजे 'पत्रिका जुळणे' ह्यावर **वैयक्तिक गुणमेलन कोष्टक** हाच रामबाण उपाय आहे. त्याच्या उपयोगाने अनेक लाभ पदरात पडतात आणि निष्कारण होणारे खर्चही वाचतात. वधू-वरांचे वैवाहिक जीवन सुखावह होण्यासाठी नुसत्या गुणमेलनावर अवलंबून राहून विवाह करण्याचा निर्णय न करता **वधू-वर कुंडलीमेलन संपूर्ण अहवाल** करवून घेणेच हितावह असते.

## वधू-वर कुंडलीमेलन संपूर्ण अहवाल

वरील विवेचनात वर्णिलेली प्रथमतः चांद्रराशिवर आधारित गुणमेलन पहाण्याची व त्यानंतर चार भावेश संबंधाचे शुभाशुभत्व पहाण्याची दाते पंचांगात सांगितलेली पद्धती अतिशय योग्य आणि तर्कसंगत आहे. त्यानंतर माझ्या संशोधनानुसार जोडीदाराच्या वैयक्तिक पत्रिकेचा विचार करण्याची मी विकसित केलेली प्रणाली अत्यंत उपयुक्त ठरते. ह्याच पद्धतीचा उपयोग करुन अत्यंत साध्या आणि सहज समजेल अशा स्वरूपात वधू-वरांच्या कुंडलीमेलनाचा संपूर्ण अहवाल मी सादर करीत असतो.

ह्या अहावालामधे वर नमूद केल्याप्रमाणे तीनही टप्प्यांचा अभ्यास, निरीक्षणे व निष्कर्ष नमूद केलेला असतो. मला सांगायला आनंद आणि अभिमान वाटतो की, वरील अहवालानुसार "स्थळ स्वीकारावे" ह्या निष्कर्षानुसार होकार देऊन संपन्न झालेल्या विवाहांपैकी एकही विवाह अयशस्वी ठरलेला नाही.

वरील सर्व विवेचनाचा वधू-वरांच्या पालकांनी विचारपूर्वक लाभ घ्यावा. ज्योतिषशास्त्राचा असा शास्त्रशुद्ध पद्धतीने उपयोग केल्यास वधू-वरांचे संसार चांगले, आनंददायी होतात व होणारच.

आपण करीत असलेल्या वधू अगर वर संशोधनास माझे यथायोग्य सहकार्य आणि मार्गदर्शन अवश्य राहील.ज्योतिषशास्त्राचा उपयोग आता आपण केवळ परंपरा म्हणून करणार नसाल तर तो सुजाणतेने करीत असाल. हाच खरा सुशिक्षितपणा आणि हेच खरे शहाणपण.

आपल्या कार्याला माझ्या हार्दिक शुभेच्छा.

## शुभं भवतु ।

संपर्क : ज्योतिषपंडित सुधीर दाते
तरडे हाईट्स, तरडे कॉलनी, सिंहगड रस्ता, हिंगणे खुर्द,
पुणे ४११ ०५१.
फोन : ०२०-२४३५६५५४, मोबाईल : ९४२३००९६५२
e-mail : sumangalsuvidha@gmail.com

## ज्योतिषशास्त्राविषयी सर्वसामान्यांच्या मनातील स्वाभाविक प्रश्न

**प्रश्न : विवाहाचेवेळी पत्रिका बघाव्यात की नाही?**

**उत्तर :** अवश्य बघाव्यात. ज्योतिष हे आपल्याकडील प्राचीन, अत्यंत उपयुक्त शास्त्र आहे. वैवाहिक जीवनाच्या दृष्टीने ह्याचा फार उपयोग होतो. अर्थातच शास्त्रशुद्ध पद्धतीने वापर व्हायला हवा

. **प्रश्न : पत्रिकाच चुकीची असेल तर समजते का?**

**उत्तर :** होय. काही ढोबळ आडाखे सुद्धा सहजपणे चुकीच्या पत्रिका लक्षात आणून देतात. विवाह करण्याचे निश्चित करण्यापूर्वी सज्ञान ज्योतिषाचा सल्ला घेणे सर्वात उत्तम. दोन्ही पत्रिका बरोबर आहेत ना हे तपासूनच सल्ला देणे हे त्याचे प्रथम कर्तव्य आहे. त्याची त्यास जाण असावी.

**प्रश्न : काही लोक पत्रिका बघताना वरवर म्हणजे गोत्र, नाडी, गुण एवढेच पहातात. ते योग्य की अयोग्य?**

**उत्तर :** संपूर्णपणे अयोग्य. पत्रिका बघायची नसेल तर बघू नका. बघायची असेल तर व्यवस्थित बघा. पण अर्धवटपणा करून शास्त्राचा अपमान करू नका.

**प्रश्न : एकनाड पत्रिका असल्यास विवाह करू नये असं म्हणतात. खरं आहे का ते?**

**उत्तर :** अर्धवट खरं आहे. नक्षत्रे नुसती एकनाडीची असून उपयोग नाही. त्यांचे ठराविक चरण असल्यासच एकनाडी दोष लागू होतो. अन्यथा नाही. हे नीट न पाहिल्यानेच चांगली स्थळे हातातून निसटून जातात हा नेहमीचाच अनुभव आहे.

**प्रश्न : ३६ गुणांनी पत्रिका जुळू नयेत असं म्हणतात. खरं काय?**

**उत्तर :** साफ चुकीचे आहे. एक राशि, भिन्न नक्षत्र असता ३६ गुण जुळतात. तेव्हा दोघांची एकच राशि असल्याने दोघांना एकाचवेळी साडेसाती येते. त्याचा धागा पकडून हा केला गेलेला अपप्रचार आहे.

**प्रश्न : मृत्यु षडाष्टक असणाऱ्या पत्रिका जुळत नाहीत हे बरोबर आहे का?**

उत्तर : हा सरसकट नियम नाही. वर-वधूंच्या नक्षत्र-चरणांचे स्वामी जर परस्परांचे मित्र असल्यास अशावेळेस षडाष्टक योगाचे दोष नाहिसे होतात. त्यामुळे पत्रिका जुळू शकतात.

**प्रश्न : लव्ह मॅरेजेस होतात तेव्हा कुठे पत्रिका बघितल्या जातात. त्यांचे नाही का संसार चांगले होत? मग पत्रिका बघायच्याच कशाला?**

**उत्तर :** प्रेम विवाह केलेल्या अनेकांचे संसार चांगले झालेले आहेत. पण म्हणून कोणाचेही संसार चांगले होतील असा निष्कर्ष काढणे शास्त्राला धरून नाही. ते अशिक्षितपणाचे लक्षण होईल. त्याऐवजी ‘आम्ही लव्ह मॅरेज केले. आमचा संसार सुखाचा झाला. आता केवळ उत्सुकतेपोटी आम्ही पत्रिका बघितल्या . त्या जुळत नाहीत.’ असे जर कोणी विधान केले तर ते खरे शास्त्राला आव्हान ठरेल. हा विषय माझ्या संशोधनातला एक छोटासा तुकडा आहे. अशी प्रत्यक्ष उदाहरणे देऊन मला माझ्या संशोधनात मदत करावी हे माझे सर्वांना विनम्र आवाहन आहे.

**प्रश्न : ज्योतिषी म्हणतात, “ पत्रिकेत असेल ते चुकत नाही.” मग तेच ज्योतिषी विवाहासाठी पत्रिका बघायला का सांगतात? पत्रिका बघण्याने नशीब बदलणार का?**

**उत्तर :** ज्योतिषांच्या ह्या अशा सांगण्यानेच खरं तर शास्त्र बदनाम झाले आहे. जगातील कोणतेही शास्त्र दैववादी नाही. शास्त्रे नेहमी प्रयत्नवादीच असतात. पत्रिकेतले चुकत नसेल तर ज्योतिषाचा अभ्यास करणेच मुळात मूर्खपणाचे होईल. हजारो वर्षे ज्योतिषाचा अभ्यास केलेले सर्व मूर्ख ठरतील. परंतु तसे नाही. एकमेकांच्या पत्रिकांचा एकमेकांवर परिणाम होतो म्हणूनच पत्रिका बघणे शहाणपणाचे आहे. लेखनमर्यादेमुळे जास्त विवरण करणे येथे उचित वाटत नाही.

**प्रश्न : मंगळ दोषासंबंधी जरा विवरण करा.**

उत्तर : पाच स्थानांमधे मंगळ असेल तर **'मंगळाची पत्रिका'** म्हणून शिक्का मारला जातो हे चुकीचे आहे. मंगळदोष नाहिसा होण्याची अनेक कारणे असतात. ती तपासली पाहिजेत. एवढेच नव्हे तर लग्नकुंडलीत मंगळ दिसतो तिथेच असतो असे नाही. त्यासाठी भावचलीत कुंडली पहाणे आवश्यक असते. हे सामान्यास समजणे अवघड. अशावेळेस ज्योतिषाचा सल्ला घेणे आवश्यक. पण तोही सुजाण आहे ना हे पारखून घेणेही आवश्यकच.

**प्रश्न : अशुभ नक्षत्रांवर जन्म असणाऱ्यांना पत्रिका नाकारल्या जाण्याच्या मोठया समस्येस तोंड द्यावे लागते. खरंच नक्षत्रे इतकी क्रूर असतात का? त्यावर उपाय काय?**

उत्तर : नक्षत्र शांति केल्याने नक्षत्रदोषाचा परिहार होतो हा अनुभव आहे आणि ते सत्यही आहे. हा प्रयत्नवाद शास्त्रकारांना मान्य आहे. पत्रिका नाकारणाऱ्यांना समुपदेशन करणे आवश्यक आहे. अर्थात झोपल्याचे सोंग घेतलेल्यांना जागं करता येत नाही. अशांना त्यांच्या अडाणीपणातच गाढ झोपून द्यावे.

**प्रश्न : कालसर्प योगाबद्दल आपले काय मत आहे?**

उत्तर : पंचांगकर्ते कै. धुंडीराजशास्त्री दाते लिखित 'धर्मशास्त्रीय निर्णय, भाग दुसरा' ह्या ग्रंथात कालसर्पयोग कसा चुकीचा आहे ह्याचे विवरण आहे. त्यांच्या पंचांगातही दोन वेळा ह्या संबंधी लेख प्रकाशित झालेला आहे.

राहू आणि केतुच्या एकाच अंगास म्हणजे अर्ध्या भागात सर्व ग्रह असल्यास हा योग आहे असे सांगणारे सांगतात. अशातऱ्हेच्या ग्रहस्थितीला योग मानता का येत नाही ह्याची सोपी, सरळ कारणमिमांसा काय ते आता पाहू. पत्रिकेतील सर्व ग्रह घडयाळाच्या काटयांच्या विरुद्ध दिशेने फिरत असतात. त्यातील सर्वात वेगवान ग्रह चंद्र आहे. आता कल्पना करा इतर सर्व ग्रह राहू आणि केतुच्या एकाच अंगास आहेत आणि चंद्र राहूवरून निघून केतुकडे निघाला. आता तो सर्वात वेगवान असल्याने इतर सर्व ग्रहांना मागे टाकत केतुवर पोहोचेल. म्हणजे ह्या काळात सर्व ग्रह अर्ध्या भागातच राहणार. हा कालावधी साधारण १३ ते १४ दिवसांचा असतो. म्हणजे ह्या १३ दिवसात जन्माला आलेले लाखो लोक कालसर्प योगाचे ? किती हास्यास्पद गोष्ट आहे ही !

एक गोष्ट ऐकिवात आली ती म्हणजे नाशिकच्या वैदिकवृंदांनी पंचांगात लेख प्रकाशित केल्याबद्दल दात्यांकडे नाराजीही व्यक्त केली आहे. बरोबरच आहे. ते सर्व दाते पंचांग वापरतात हे त्यांच्या कर्म करण्यास आलेल्या यजमानांच्या लक्षात येते. त्याच पंचांगात वरील लेख असताना ते क्रियाकर्म कसे करतात? आता, ह्या प्रश्नाचे उत्तर कोण देणार? सूज्ञास जास्त सांगणे न लगे.

तरी ह्या **भीतीदायक शीर्षकाच्या** तथाकथित योगास निष्कारण महत्त्व देऊ नये.